सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

कृषि विभाग

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

००५ ४०० मुंबई , कफ परेड ,वर्ल्ड ट्रेड सेंटर ,अर्केड ३०

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ईमेल-:mahapocra@gmail.com

**पत्र क्र.नादेकृसंप्र -०१२४/प्र.क्र.०७/प्र.शा./१५६ दिनांक: २६ /०२ /२०२४**

**प्रति,**

**————————**

**विषय-: कार्यालयीन कामकाजाकरिता आवश्यक लेखन सामग्री व तत्सम साहित्याचा पुरवठा करण्यानुषंगाने सील बंद दरपत्रके मागविणेबाबत...**

१ . आपणास खालील मालाचा / साहित्याचा पुरवठा करण्यासाठी स्पर्धात्मक दर सादर करणे विनंती करण्यात येत आहे.

| मालाचे / साहित्याचे वर्णन | तांत्रिक निकष | संख्या | पुरवठा करावयाचा कालावधी | पुरवठा करावयाचे ठिकाण | स्थापनेसाठी आवश्यकता (Installation Requirement) |
|---|---|---|---|---|---|
| लेखन सामग्री व तत्सम साहित्याचा पुरवठा | लागू नाही. | तपशील सोबत जोडला आहे. | संपर्क साधल्यावर लगेच | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प ३० अ/ब- अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४००००५. | नाही. |

२. शासनास जागतिक बँकेकडून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पासाठी निधी मंजूर झालेला आहे. सदर निधी मधील काही रक्कम या दरपत्रकान्वये करण्यात येणाऱ्या करारनाम्यानुसार करावयाच्या पात्र प्रदानासाठी वापरण्यात येणार आहे .

३. निविदा किंमत

अ. करार हा वरील नमूद केलेल्या मालाचा पुरवठा करण्याबाबत असून त्यात काही बदल असु शकेल.

ब . वस्तूच्या एकूण किंमतीमध्ये सर्व कर व उपकर यांचा समावेश असेल.

क. वस्तू व सेवाकर वेगळा दाखविण्यात यावा.

ड. निविदाकाराने सादर केलेले दर हे करारनाम्यातील कालावधीसाठी स्थिर असतील व त्यात कोणत्याही कारणामुळे बदल होणार नाही.

इ. दरपत्रकातील दर हे भारतीय रुपयात सादर करावेत.

४. प्रत्येक पुरवठादार एकच दरपत्रक सादर करेल. या दरपत्रकाबाबत पुरवठादार इतर पुरवठादारांशी संपर्क करणार नाही.

५. दरपत्रकाची वैधता

दरपत्रक सादर करावयाच्या अंतिम तारखेपासून ६० दिवसापर्यंत दरपत्रक वैध राहील.

६. दरपत्रकासोबत सादर करावयाची कागदपत्रे

**अ. सेवा पुरवठादार हा Shop Act खाली नोंदणीकृत असावा. (दाखला आवश्यक)**

**ब. पुरवठादाराने दरपत्रक सादर करताना त्याचे Pan Card व GST Certificate सादर करावे.**

**क. मागील एक वर्षात केलेल्या कामांचे पुरवठा आदेश.**

७.दरपत्रकांचे मुल्यमापन:

खरेदीदार खालील बाबींबाबत निविदाकरांनी दिलेल्या प्रतिसादाशी दरपत्रकांची तुलना व मुल्यमापन करेल.

अ. दरपत्रके योग्य प्रकारे स्वाक्षरी केलेले आहेत.

ब.दरपत्रकातील अटी, शर्ती व निकषांची पूर्तता करतात. दरपत्रकातील सर्व वस्तूंची तुलना व मुल्यमापन एकत्रित करण्यात येईल. त्यानंतर सर्वात कमी दर असलेल्या (Least Cost Selection) दरपत्रकाची निवड करण्यात येईल.

क. वस्तु व सेवाकर दरपत्रकांचे मुल्यमापन करण्यासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

ड. सदर दरपत्रकात नमूद संख्येनुसार पुरवठा करण्यासाठी निश्चित केलेल्या कालावधीत वस्तूंच्या मागणीत घट/वाढ संभवते. त्यानुसार वेळोवेळी आवश्यकतेनुसार पुरवठ्यासाठी केलेल्या मागणीनुसार वरील प्रमाणे निश्चित दराने पुरवठा करणे आवश्यक राहील.

८. पुरवठा आदेश

ज्या पुरवठादाराचे दरपत्रक सर्वात ज़ास्त प्रतिसादात्मक असून त्याचे दर हे सर्वात कमी आहेत त्या पुरवठा दारास पुरवठा आदेश देण्यात येईल.

८.१ सेवा खरेदीदारास कोणतेही दरपत्रक मान्य करण्याचा वा अमान्य करण्याचा अधिकार व दरपत्रकांची प्रक्रिया रद्द करुन सर्व दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार राहील.

८.२ ज्या पुरवठादाराचे दर मान्य करण्यात आलेले आहेत त्यांना आवश्यकतेनुसार सेवा पुरवठा करणेबाबत कळविण्यात येईल. मान्य केलेल्या दराबाबतच्या अटी पुरवठा आदेशमध्ये समाविष्ठ करण्यात येतील.

९. **पुरवठा कालावधी :** पुरवठा आदेशापासून १ वर्ष किवा प्रकल्पाचा टप्पा १ संपूष्टात येई पर्यंत.

१० . मालाचा पुरवठा केल्यानंतर देयकाची अदायगी करण्यात येईल.

११ . पुरवठा केलेल्या मालासाठी सामान्य व्यावसायिक हमी (Warranty/ Guaranty)लागू राहील.

१२ . आपणांस विनंती करण्यात येते की, आपले सील बंद दरपत्रक दि. ७ /०३ /२०२४ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करावेत. सदर दरपत्रकाच्या लिफाफ्यावर दरपत्रकाचा विषय व दरपत्रक उघडण्याची तारीख व दिनांक नमूद करण्यात यावा. सदर दरपत्रक दि. ७ /०३ /२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता सर्वासमक्ष उघडण्यात येतील.

१३. आम्हाला आशा आहे की, आपण आपले दरपत्रक सादर कराल तसेच, आपण या प्रकल्पात इच्छा दाखविल्याबाबत धन्यवाद.

**(टिपणी: दरपत्रकावर कोणत्याही प्रकारे खाडाखोड आणि वाईटनर असल्यास ते स्वीकारले जाणार नाही.)**

दिनांक : २६ /०२ /२०२४
ठिकाण : मुंबई

नावः प्रताप गिते
हुद्दाः प्रकल्प उपसंचालक
पत्ताः ३०/ब अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर,
कफ परेड , मुंबई-०५.
दुरध्वनी क्रः ०२२-२२१६३३५१/५२